**निशाणी क्रमांक 74 पुढे/**

**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांचा उर्वरीत सरतपास शपथेवर पुढे सुरू :—**

**वादीतर्फे विधिज्ञ पिलाणे**

१. सदरकामी मी निशाणी क्र. ३/१ लगत मौजे— चांबळी येथील गाव नमुना ८ अ खाते क्र. ६९१ ची सत्यप्रत दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र. ७७ देण्यात येते. सदरकामी मी निशाणी क्र. ३/२ लगत मौजे चांबळी येथील भुमापन क्र. ६६० चा सन २००८—०९ ते सन २०१५—१६ पर्यंतचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्यास निशाणी क्र. ७८ देण्यात येते. सदरकामी मी निशाणी क्र. ७६ लगत दि. ०८ ऑक्टोबर १९९८ रोजीचे नोंदणीकृत खरेदीचे साठेखत दाखल केले आहे. त्यावर लिहून घेणार म्हणून माझी व लिहून देणार म्हणून सोपान गणपत कामथे यांची व साक्षीदार म्हणून अनिल शामराव कामथे प्रतिवादी क्र. ३ व जनार्दन शंकर कामथे यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र. ७९ देण्यात येते. सदरकामी मी दि. ०४.१०.२०१६ रोजीची प्रतिवादींना पाठवलेली नोटीस दाखल केली आहे. त्यावर विधिज्ञ ॲड. किशोर म्हस्के पाटील यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र. ८० देण्यात येते. सदरकामी मी प्रतिवादींना निशाणी क्र. ८० लगत पाठवलेल्या नोटीसीच्या पोस्टाच्या पावत्या व पोहोच दाखल केल्या आहेत. त्यास अनुक्रमे निशाणी क्र. ८०/१ ते ८ देण्यात येते. सदरकामी मी मा. पोलिस निरीक्षक सासवड पोलिस स्टेशन सासवड यांना दिलेल्या तक्रार अर्जाची पोहोच पावती प्रत दाखल केली आहे.त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र. ८१ देण्यात येते.

२. सदरकामी मी मौजे चांबळी येथील गट नं. ६६० चा सन १९६१—६२ ते ७१—७२ चा ७/१२ उतारा, सन १९७४—७५ ते सन १९८५—८६ चा ७/१२ उतारा, सन १९८५—८६ ते १९९५—९६ चा ७/१२ उतारा, सन १९९६—९७ ते सन २००७ —०८ रोजीचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्यास अनुक्रमे निशाणी क्र. ८२ ते ८५ देण्यात येते. सदरकामी मी मौजे चांबळी येथील फेरफार क्र. ८९८१ ची प्रत दाखल केली आहे. त्यास निशाणी क्र. ८६ देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**प्रतिवादी व त्यांचे विधिज्ञ पुकारले असता गैरहजर संधी म्हणून उलटतपास तहकूब.**

माझे समक्ष श्रवणोत्तर स्विकृत

RAVINDRA ANANDRAO SAWANT
Digitally signed by RAVINDRA ANANDRAO SAWANT
Date: 2026.04.09 16:57:16 +0530

( र.आ.सावंत )
प्रथमवर्ग न्यायंदडाधिकारी,
सासवड.

दिनांक ०९/०४/२०२६